## <u>नियमित दिवाणी दावा क्र.१५९/२०२३ मधील</u>
## <u>नि.१८ खालील आदेश</u>

प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा हुकुम रद्द होऊन मिळणेसाठी केलेला आहे.

(२) वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी क्र.३ यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांचे वय वर्षे ८३ आहे व वयोमानानुसार आजारी असलेने तसेच दरम्यानच्या कालावधीत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांना दावेचे कामी हजर राहता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्द दिनांक ०२.०९.२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत करणेत आला आहे. प्रतिवादी क्र. ३ या जाणूनबुजून दाव्याचे कामी गैरहजर राहिलेल्या नव्हत्या व नाहीत. तरी प्रतिवादी क्र.३ विरुध्द झालेला एकतर्फा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, प्र.वादी यांचा अर्ज मान्य व कबूल नाही. त्यामुळे अर्ज चालविणेस पात्र नाही. सबब प्र.वादीचा सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

(४) नि.१८ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.३ ला दाव्याचे कामी दि.०३.०८.२०२३ रोजी समन्सची बजावणी होऊनदेखील ते वेळेत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादी क्र. ३ यांनी कथन केले की, प्रतिवादी हे वयस्कर असलेमुळे तसेच आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे ते प्रकरणात हजर होवू शकले नाहीत. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असून प्रतिवादी क्र.३ या दाव्याकामी आवश्यक पक्षकार असून त्यांचे हक्क वाद मिळकतीत गुंतलेले आहेत. दावा गुणदोषावर अंतिम निकाली होण्याकरीता सदर प्रतिवादीस दाव्यात हजर होण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने

गरजेचे आहे. प्रतिवादीने अर्ज दाखल करण्यास विलंब केला असला तरी दाव्याचे स्वरुप व प्रतिवादीचे हक्क लक्षात घेता केलेला विलंब नुकसान भरपाई देऊन माफ करणे न्यायोचित वाटते. सबब सदर अर्ज र.रु.२००/- इतका खर्च वादीस देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.३ यांचा निशाणी १८ वरील अर्ज र.रु.२००/- (दोनशे रुपये मात्र) इतका खर्च वादीस देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2024.08.19 11:22:14 +0530

विटा.
दि. १७.०८.२०२४.

**(श्रीमती अ. ब. सोनटक्के)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.